29

# भारतातील शहरी दारिद्र्य आणि झोपडपट्टी : एक मूल्यमापन

**वाढवणकर संतोष नंदकुमार**
संशोधक विद्यार्थी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## ➢ प्रस्तावणा :

दारिद्र्य ही समस्या देशापासून गावापर्यंत आणि समाजापासून कुटुंबापर्यंत पसरलेली आहे. खरे तर हा जगाचा न सुटणारा प्रश्न झालेला आहे, कारण प्रत्येक देश या समस्येला तोंड देताना दिसतो आहे. भांडवलशाही देशापासून कृषी क्षेत्रावर आधारीत अर्थव्यवस्था चालवणाऱ्या देशात या दारिद्र्याने अपली मुळे पसरवलेली आहेत. ती सापेक्ष किंवा निरपेक्ष या स्वरूपातील तिचे अस्तित्व आहेच. यामुळे जे लोक दारिद्र्याचे जीवन जगत आहेत त्यांना तर याचा जास्त त्रास होतोच पण जे त्याच्याशी संबंधीत नाहीत त्यांना ही याचा त्रास होत असतो. या सर्व गोष्टींचा अभ्यास केला तर दारिद्र्याची संकल्पना मांडने कठीण जाते.

भारतात दांडेकरांपासून ते तेंडूलकरांपर्यंत सर्वांनी आपल्या परीने विचार मांडण्याचा आणि दारिद्र्याची संकल्पना स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. तशा शिफारशी ही काही प्रमाणात स्विकारण्यात आलेल्या आहेत पण दारिद्र्याचा प्रश्न सुटला नाही. आता सी. रंगराजन काय म्हणतात ? त्यांची मांडणी कशी आहे? लवकरच या समितीचा अहवाल येईल. सद्य परिस्थितीत रमेश तेंडूलकर यांच्या २००४ च्या अहवालानुसार या संशोधन निबंधाची मांडणी करण्यात आली आहे.

सदरील संशोधन निबंधाचा विषय हा शहरी दारिद्र्य आणि झोपडपट्टी याच्याशी संबंधीत आहे. शहरी दारिद्र्याचे वाढत जाणारे प्रमाण यास शहरीकरणात होत असलेली प्रचंड वाढ करणीभूत आहे. ग्रामीण भागात रोजगाराच्या कमी झालेल्या संधी आणि शहरात होणारे उद्योगाचे केंद्रिकरण यामुळे ग्रामीण भागातील गरीब लोक रोजगाराच्या शोधात शहरात येतात. ग्रामीण दारिद्र्यातील आणि काम न मिळलेले लोक कामाच्या आणि पैशाच्या शोधात शहराकडे धाव घेतात. त्यामुळे शहरी दारिद्र्यात वाढ होत आहे. संपूर्ण भारताच्या ग्रामीण आणि शहरी लोकसंख्येचा अभ्यास करताना मागील शंभर वर्षात शहरी भागातील लोकसंख्येत झालेली वाढ ही चिंतेची बाब बनत चालली आहे. यामध्ये आर्थिक असमतोल आणि दारिद्र्य यांच्यातील संबंध हा स्थल काल व्यक्ती निहाय झालेल्या विकासावर अवलंबून असलेले आढळून येते. यामुळे मुंबई सारख्या शहरात जगातील दोन क्रमांकाची झोपडपट्टी कधी निर्माण झाली हे कळाले देखील नाही. मात्र आज विकासाचे नियोजन करताना सरकारची होणारी फजिती यात नवल वाटण्यासारखे काहीही नाही.

भारतात मागील दशकात प्रथमच २००१ साली झोपडपट्टीची जनगणना करण्यात आली. यात महाराष्ट्र, आंध्रप्रदेश आणि उत्तरप्रदेशात मोठया प्रमाणात लोकसंख्या निदर्शनात आली आहे. भारतातील शहरीकरणात होत जाणारी वाढ आणि झोपडपट्टयांच्या संखेत झालेली वाढ ही ग्रामीण बेरोजगारीचे परिणाम आहेत. शहरातील दारिद्र्यरेषेखालील लोकांचे भारतातील प्रमाण वर्ष २००४- ०५ नुसार २७.५ टक्के आढळून आलेली आहे. आज शहरात केला जाणारा विकास म्हणजे झोपडपट्टी मधील सुधारणा, पायाभूत सुविधांचा दर्जा व इतर योजनांचे प्रमाण वाढविणे गरजेचे आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर दारिद्र्यनिर्मुलनास देशाच्या नियोजन प्रक्रियेत मोठे स्थान मिळालेले आहे. मात्र दारिद्र्य हा देशाला लागलेला रोग आहे. आशा प्रकारे तो नष्ट करण्याचा प्रयत्न सरकारी पातळीवर करण्यात आले मात्र असे म्हणतात की त्याचे प्रमाण कमी झाले पण तो समुळ नष्ट झाला नाही. म्हणून देशातील दारिद्र्याशी संबंधीत असलेला विषय म्हणजे शहरी दारिद्र्य होय. त्याची भारतातील वास्तव स्थिती काय आहे हे पाहण्यासाठी सदर शोध निबंधाचा अभ्यास केला जात आहे.

## ➢ शोधनिबंधाची उद्दिष्टे :

१) भारतातील शहरी दारिद्र्याचे अवलोकन करणे.
२) शासनाने नेमलेल्या दारिद्र्याचा अभ्यास करणाऱ्या समितीचा आढावा घेणे.
३) दारिद्र्यामुळे निर्माण होणाऱ्या शहरी झोपडपट्ट्यांचा अभ्यास करणे.

## ➢ शोधनिबंधाची गृहितके :

१) भारतातील शहरी दारिद्र्याचे प्रमाण कमी झालेले दिसून येते.
२) समितीनी सुचविलेल्या शिफारशीमुळे शहरी दारिद्र्य निर्मूलनावर परिणाम झालेला दिसून येतो.

३) शहरी दारिद्र्याचे मुळ कारण झोपडपट्ट्यांची वाढ असू शकते.

- **संशोधन पध्दती :**

भारतातील शहरी दारिद्र्य आणि झोपडपट्टी : एक मूल्यमापन हा शोधनिबंध पुर्णतः दुय्यम सामग्रीवर आधारीत आहे. व्दितीय साधन सामग्रीत संदर्भ ग्रंथ, शासनाचे अहवाल, मासिके, तसेच संबंधित लेखासाठी उपयुक्त असणारी महत्वपूर्ण माहिती व आकडेवारी विविध संकेतस्थळावरून घेतलेली आहे.या साठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे.

- **भारतातील शहरी दारिद्र्य :**

दत्त सुंधरम यांच्या मते दारिद्र्यरेषा म्हणजे ज्या खर्चाच्या पातळीस पोषणासाठी असलेली किमान उष्मांक व इतर जीवनावश्यक वस्तू उपलब्ध होऊ शकतात ती खर्चाची पातळी होय.

**तक्ता क्र. ०१**

**भारतातील शहरी दारिद्र्याचे प्रमाण**

| जनगणना वर्ष | अहवाल वर्ष | शहरी दारिद्र्याचे प्रमाण (%) | देशातील एकूण दारिद्र्याचे प्रमाण (%) |
|---|---|---|---|
| १९७१ | १९७०-१९७१ | ४१.५० | ४९.०० |
| १९८१ | १९८२-१९८३ | ४०.८० | ३८.२० |
| १९९१ | १९९३-१९९४ | ३२.४० | ३६.०० |
| २००१ | १९९९-२००० | २३.६० | २६.१० |
| २००१ | २००४-२००५ | २५.७० | २७.५० |
| २०११ | २०११-२०१२ | १३.७० | २१.९० |

भारताची जनगणना २००१-२०११

वरील तक्त्याचा अभ्यास करता देशातील १९७१ ते २०११ पर्यंतच्या चार दशकातील शहरी दारिद्र्याच्या प्रमाणाचा आढावा घेता येईल. या तक्त्यातील सर्व आकडेवारी त्या दशकातील अहवालानुसार घेण्यात आलेली आहे. त्यामुळे जनगणना वर्ष आणि अहवाल वर्ष आशी वेगळी मांडणी केलेली आहे. १९७०-७१ मधे भारतात शहरी दारिद्र्याचे प्रमाण ४१.५ टक्के होते तर २०११-१२ मधे ते १३.७ टक्के असल्याचे आढळून आलेले आहे. सदरील ४० वर्षात २७.८ टक्के प्रमाण कमी झाले आहे. भारतातील एकूण दारिद्र्याच्या प्रमाणाचा विचार केला तर १९७०-७१ मधे ४९ टक्के होते तर २०११-१२ मधे ते प्रमाण २१.९ टक्के आहे. देशाचा विचार करता २७.१ टक्के एवढे दारिद्र्याचे प्रमाण कमी झालेले आहे.

देशातील एकूण दारिद्र्याचे आणि शहरी दारिद्र्याचे प्रमाण सम पातळीवर कमी झालेले दिसून येत आहे. मागील दहा वर्षात २००१ ते २०११ मधे दारिद्र्याचे प्रमाण १२ टक्केनी कमी झाले आहे.तर देश पातळीवर एकूण दारिद्र्याचे प्रमाण ५.६ टक्केनी कमी झाले आहे. संशोधनासाठी निवडलेले पहिले उद्दिष्ट म्हणजे ***भारतातील शहरी दारिद्र्याचे अवलोकन*** करत असताना ***भारतातील शहरी दारिद्र्याचे प्रमाण कमी झालेले दिसून येते*** हे गृहितक येथे सिध्द होते.

- **भारतातील शहरी झोपडपट्टीचे प्रमाण :**

आज शहरातील लोकसंख्येचा अभ्यास केला असता तेथे दोन प्रकारच्या लोकांचे वास्तव्या आढळून येते. एक मालक वर्ग आणि दुसरा कामगार वर्ग यामुळे शोषीतांचे प्रमाण जास्त असलेले आढळून येते. या मालक वर्गानी यंत्रसामुग्रीचा वापर वाढवूण अनेक लोकांना बेरोजगार केले आहे. रोजगाराच्या निमित्ताने शहरात आलेले हे लोक व त्यांची वाढत जाणारी संख्या त्यांची शहरातील निवासाची समस्या निर्माण होत आहे. शासनाच्या मालकीच्या जागेत जेथे सुविधांचा अभाव आहे आणि कोणीही आपणाला उठवू शकणार नाही अशा ठिकाणी हे लोक स्वताचे घर संसार थाटतात. यातून एकाचे दोन, दोनाचे चार आणि असंख्य घरे निर्माण होवून झोपडपट्टीची निर्मिती होते.शहाराचा आर्थिक विकास आणि नागरीकरण यांचा जवळचा संबंध आहे. परंतू आर्थिक विकासापेक्षा नागरीकरणाचा वेग जास्त असल्याने शहरात अनेक समस्या निर्माण होताना दिसतात. झोपडपट्ट्यांची वाढ ही एक नागरीकरणाचे वैशिष्ट्ये ठरत आहे. औद्योगिकरणाचा वाढता प्रभाव हे प्रमुख कारण झोपडपट्ट्यांच्या वाढीस कारणीभूत ठरताना दिसते. जगभरातील एकूण शहरी लोकसंख्येच्या १३ टक्के लोकसंख्या झोपडपट्टीत राहताणा दिसून येते.

**तक्ता क्र ०२**
**भारतातील शहरी झोपडपट्टीचे प्रमाण**

| देशातील एकूण झो. शहरे | देशातील एकूण लोकसंख्या | | | देशातील एकूण झो. लोक संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | स्त्री | पुरूष | एकूण | स्त्री | पुरूष |
| ६०७ | १७८३९३९४१ | ८४०३९०७ | ९४३५४९१४ | ४०२९७३४१ | १८८०८३२६ | २१४८९०१५ |

भारताची जनगणना २००१

२००१ ते २०११ या काळात शहरामधील झोपडपट्टीत ७७ कोटी ते ८३ कोटी इतक्या मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. २०२० पर्यंत ९० कोटी वाढ शक्याता आहे. एकूण शहरी भागातील झोपडपट्टीमधून दारिद्र्याचे प्रमाण लोकसंख्या वाढीबरोबर वाढत चाललेली दिसते.

- **निष्कर्ष :**
  १) ग्रामीण भागातील औद्योगिकरणाच्या असमतोलामुळे शहरी दारिद्र्यत वाढ झालेली आहे.
  २) शहरात राहण्याच्या जागेची समस्या असल्याने झोपडपट्ट्यांची वाढ होताना दिसते.
  ३) शहरी दारिद्र्याचे प्रमाण कमी झालेले आहे.
  ४) सर्वच समितीनी कॅलरीजच्या स्वरूपात दारिद्र्याची संकल्पना मांडली आहे.

- **उपाययोजना :**
  १) ग्रामीण भागातील औद्योगिक विकासाला चालना देणे.
  २) दारिद्र्याचा अभ्यास हा पायाभूत गरजांना समोर ठेऊन मांडणे आवश्यक आहे.
  ३) झोपडपट्टीतील लोकांच्या वाढत्या प्रमाणावर नियंत्रण ठेवणे.
  ४) शहरी दारिद्र्य रेषेखालील लोकांच्या उत्पन्नची योग्य मर्यादा ठरवणे आवश्यक आहे.

- **सारांश:**

संपूर्ण शोध निबंधाचा आढावा घेतला असता असे लक्षात येते की एकूण भारताच्या लोकसंख्येत होणारी वाढ आणि दारिद्र्याचे प्रमाण यात होणारी घट ही पूर्णतः विरोधाभास आहे. सरकारने योजलेल्या सामाजिक योजना शहरातील झोपडपट्ट्यात राहणाऱ्या दारिद्र्य रेषेखालील लोकांसाठी आपले जीवन बदलण्यासाठी व राहणीमाणाचा दर्जा सुधारण्यासाठी राबवण्याचा प्रयत्न केले आहेत. एकूणच सर्व समितींचा अहवाल व योजनांची अमलबजावणी यातून भारतातील दारिद्र्याचे प्रमाण कमी करण्यासाठी शहरातील स्थलांतर थांबवणे आणि ग्रामीण भागतील औद्योगीकरणास चालना देणे महत्वाचे आहे. सरकारच्या दारिद्र्य रेषेची गणना पध्दतीत सुधारणात्मक बदल होणे आवश्यक आहे.

- **संदर्भग्रंथ :**


1) Dr. Kumar K., Planning Poverty And Economic Development, Deep & Deep Publications, New Delhi, 1984.
2) Karpagam M., Environmental Economics, Sterling Publishers, New Delhi, 2010.
3) Nagraja G.H., Urban Poverty in India- A Study, Southern Economist, Bangalore, November 1, 2013.
४) प्रा. भोसले काटे, भारतीय अर्थव्यवस्था, फडके प्रकाशन,कोल्हापूर,२०१०.
५) डॉ. कायंदे पाटील गंगाधर, भारतीय अर्थव्यवस्था, चैतन्य पब्लिकेशन, नाशिक, २००२.
६) डॉ. खंदारे सुखदेव, भारतीय अर्थव्यवस्था, एज्युकेशन पब्लिशर्स, औरंगाबाद, २०१३.
७) डॉ. ज्योत्स्ना देशपांडे, विकासाचे अर्थशास्त्र, पिंपळापुरे पब्लिशर्स,नागपूर, २०११.